अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. २७ नोव्हेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ५८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## आज गुरूनानक जयंती



## भारताचा ऑस्ट्रेलियावर ४४ धावांनी विजय

**विशाखापट्टणम** : भारत आणि ऑस्ट्रेलियातील दुसरा टी-२० सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला आहे. टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाला ऑल आऊट केलं आहे. सामन्यात भारतीय खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी पहायला मिळाली. या विजयानंतर टीम इंडियाने मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. ऑस्ट्रेलियाने टॉस जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पण, भारतीय फलंदाजांनी हा निर्णय चुकीचा ठरवत ऑस्ट्रेलियन गोलंदाजांची धुलाई केली. दरम्यान ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. भारताकडून सलामीवीर ऋतुराज गायकवाड आणि यशस्वी जयस्वाल यांनी डावाला चांगली सुरुवात करुन दिली. यशस्वीने दोन षटकार आणि ९ चौकारांच्या मदतीने अवघ्या २५ चेंडूत ५३ धावा कुटल्या. तिसऱ्या क्रमांकावरील इशान किशननेही यशस्वीप्रमाणेच ऑस्ट्रेलियन गोलंदाजांची धुलाई केली.

# आरक्षणाचा सर्वाधिक फायदा मराठ्यांना : भुजबळ

## मोदींनी दिलेल्या १० टक्के आरक्षणात ८५ टक्के मराठे; १५.५० टक्के आयएएस; २८ टक्के आयपीएस

सुराज्य/हिंगोली

**ज्या मराठा समाजाला आरक्षण नाही, असे म्हणता त्या मराठा समाजालाच आरक्षणाचा सर्वाधिक फायदा झाला असून मोदींनी दिलेल्या १० टक्के आरक्षणामध्ये ८५ टक्के जागा या मराठा समाजाला मिळाल्या असल्याचा गौप्यस्फोट राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी केला.**

केंद्रीय लोकसेवेच्या आएएसमध्ये १५.५० टक्के तर आयपीएसमध्ये २८ टक्के मराठा समाजाचे लोक असल्याची आकडेवारीही भुजबळांनी मांडली. हिंगोलीमध्ये रविवारच्या ओबीसी एल्गार महासभेत बोलताना भुजबळांनी मनोज जरांगेंवर टीकास्त्र सोडत ही आकडेवारी समोर मांडली.

भुजबळ यांनी मराठा आरक्षणासाठी लढणाऱ्या मनोज जरांगे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, इतरांना दिलेल्या आरक्षणाचा सर्वाधिक फायदा हा मराठा समाजाला झाला आहे. मोदी सरकारने दहा टक्के आरक्षण दिले, पण त्यामध्ये ८५ टक्के जागा या मराठा समाजाला मिळाल्या.

उरलेल्या ४० टक्के जागांमध्ये मराठा समाजाला जागा मिळाल्या. आमच्या २७ टक्के आरक्षणामध्येही मराठा समाज आहे. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण नसतानाही सर्वाधिक फायदा मिळतोय.

गेल्या वर्षभरात झालेल्या ६५० नियुक्त्यांपैकी ८५ टक्के नियुक्त्या या मराठा समाजाला मिळाल्या आहेत, असे छगन भुजबळानी सांगितलं.

### भुजबळांनी सांगितलेली आकडेवारी

**ईडब्ल्यूएस मध्ये ७८ टक्के मराठा समाजाला आरक्षण मिळाले.**

- ए ग्रेड - ३३.५० टक्के
- बी ग्रेड - २९ टक्के
- सी ग्रेड - ३७ टक्के
- डी ग्रेड - ३६ टक्के

- आयएएस - १५.५० टक्के
- आयपीएस- २८ टक्के
- आयएफएस- १८ टक्के

**मराठा समाजाला लोकसेवा आयोगातील प्रतिनिधित्व**


- मंत्रालय कॅडरमध्ये
- ए ग्रेड - ३७.५०
- बी ग्रेड - ५२.३०
- सी ग्रेड - ५२
- डी ग्रेड - ५५.५० टक्के

### आर्थिक मदतही मिळाली

मराठा समाजाला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून ओबीसींपेक्षा जास्त फायदा झाल्याचे भुजबळ म्हणाले. मराठा समाजामध्ये गरीब आहेत, आमचा त्यांना विरोध नाही, पण त्यांना आताही आरक्षणाचा लाभ मिळतोय. अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाच्या माध्यमातून ७० हजार लाभार्थ्यांना ५१६० कोटी रुपये देण्यात आले. ओबीसींना अद्यापही तेवढे देण्यात आले नाहीत. राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती, पंजाबराव देशमुख महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजाला १०,५०० कोटी रुपये देण्यात आले आहेत,

असेही त्यांनी सांगितले.

गायकवाड अहवाल सर्वोच्च न्यायालयासमोर ठेवल्यानंतर न्यायालयानेही मराठा समाज मागास नसल्याचं सांगत आरक्षणाची गरज नसल्याचं मत व्यक्त केलं होतं असं राज्याचे मंत्री छगन भुजबळ म्हणाले.




## उळेजवळ एसटी पलटली; आठ प्रवासी जखमी

### अरुंद पूल ठरले अपघातास कारणीभूत

सुराज्य/सोलापूर



सोलापूर -धुळे राष्ट्रीय महामार्गावर उळे-कासेगांव येथील पुलावर एस.टी. बसला अपघात होऊन ती पलटी झाली. ही दुर्घटना रविवारी पहाटे पावणे पाच वाजण्याच्या सुमारास घडली.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक रहिवाशांनी दुर्घटनास्थळी धाव घेऊन जखमींना अपघातग्रस्त बसमधून बाहेर काढून उपचारासाठी सोलापूरच्या शासकिय रूग्णालयात पाठवून दिले. या अपघाताला निमंत्रण देणारा अरुंद पूल कारणीभूत असावा, असे दिसून आले.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची (एम.एच.०६. एस.८७२९) बस सोलापूरहून भोकरकडे (नांदेड) निघाली होती. सोलापूर बस स्थानकावरून सुटलेल्या एसटी बसला अवघ्या १४ किलोमीटर अंतरावर राष्ट्रीय महामार्गावरील उळेगांव येथील अरुंद पूलावर अपघात झाला. एस.टी.बस पुलाच्या कठड्याला घासून पाठीमागील दोन्ही चाके निखळून बस पलटी झाली.

अपघाताचा आवाज ऐकून जागे झालेल्या काही स्थानिक ग्रामस्थांनी दुर्घटनास्थळाकडे धाव घेतली. उळेगांवचे पोलीस पाटील पांडुरंग कुंभार, श्रीकांत आरगे, त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्काळ मदतकार्य करून बसमधील सर्व जखमींना सोलापूर सिव्हील हॉस्पिटलला पाठविले. या दुर्घटनेत बस चालकासह आठ प्रवासी जखमी झाले आहेत.

सोलापूर-धुळे महामार्गावर असलेला उळेगांव येथील दोन्ही बाजूपैकी तुळजापूर-सोलापूर वाहतूक मार्गावर नव्याने बांधण्यात आलेल्या पुलावर अपघातांची संख्या वाढत आहे. मात्र सोलापूरकडून तुळजापूरकडे जाणाऱ्या लेनवर जुना पूल आहे. जो पूल अरुंद आहे. या पुलाच्या आसपास आजपर्यंत अनेक अपघात झाले असून, काहींना आपल्या प्राणास मुकावे लागले आहे.

या अपघाताची माहिती मिळाल्यावर राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी रविवारी सकाळी दुर्घटनास्थळी येऊन घटनास्थळ आणि अपघातग्रस्त वाहनाची पाहणी केली. पाहणी पथकात आगार व्यवस्थापक जुंधळे, यंत्र अभियंता लोंढे, विभागीय वाहतूक अधिकारी पाटील होते. पोलीस दल येऊन जखमींना मदतीचा हात दिला.

## एमबीबीएसमध्ये शिक्षण घेणाऱ्या भावी डॉक्टराची आत्महत्या

सुराज्य/सोलापूर



एमबीबीएसच्यो दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या एका बावीस वर्षीय भावी डॉक्टराने रेल्वेखाली उडी टाकून आत्महत्या केली. ही घटना होटगी (दक्षिण सोलापूर) येथील रेल्वेब्रींजजवळ रविवारी सकाळच्या सुमारास घडली.

सचिन श्रीमंत चौधरी (वय-२२, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. तो कुंभारी येथील अश्विनी वैद्यकीय महाविद्यालयात द्वितीय वर्षात शिकण्यास होता. रविवारी सकाळी त्याने हॉस्टेलमधून एका मित्राची दुचाकी घेऊन बाहेर गेला होता. १० वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह होटगी परिसरातील श्रीमंत सोनकवडे यांच्या शेतालगतच्या रेल्वे रुळावर छिन्नविछीन्न अवस्थेत आढळून आला.याची माहिती मिळाल्यानंतर वळसंग पोलिसांनी घटनास्थळी येऊन मृतदेहाचा पंचनामा करून तो शासकीय रुग्णालयाकडे पाठवून दिला. रुग्णालयात वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. मयत सचिन चौधरी हा अभ्यासात हुशार होता. त्याचे वडील शेती करतात. शवविच्छेदन झाल्यानंतर त्याचा मृतदेह नातेवाईकाच्या स्वाधीन केले. ॲम्बुलन्सने छत्रपती संभाजीनगर येथे नेण्यात आला. याची नोंद वळसंग पोलिसात झाली. तपास फौजदार शेख करीत आहेत.




## अर्धनारी नटेश्वर मंदिरात दीपोत्सव

**वेळापूर: त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त वेळापुरातील अर्धनारी नटेश्वर मंदिरामध्ये हजारो पणत्या दिवे लाऊन दीपोत्सव साजरा करण्यात आला. लख्ख लख्ख दिव्यांच्या प्रशाकांनी मंदिर प्रकाशाने न्हाऊन निघाले होते.**

**(छाया: अनिकेत आडत)**

## भाजलेल्या विवाहितेचा मृत्यू

**सोलापूर** : विजयपूर रोडवरील मंत्रीचंडकनगर येथे भाजून जखमी झालेल्या सुनिता देवेन बुधवंतराव (वय-४०) या शासकिय रुग्णालयात उपचार घेताना मयत झाल्या. त्या दि. १३ नोव्हेंबर रोजी घरात भाजून जखमी झाल्या होत्या. त्यांना यश (मुलगा) याने शासकिय रुग्णालयात दाखल केले होते. विजयपूर नाका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## दुचाकीवरून पडल्याने वृद्ध महिलेचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

दुचाकीच्या पाठीमागे बसून प्रवास करताना खाली पडून जखमी झालेल्या मैनाबाई शेषेराव संगशेट्टी (वय-६०, लोहारा, धाराशिव) या सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना मयत झाल्या. त्या शुक्रवारी सकाळच्या सुमारास दुचाकीच्या पाठीमागे बसून काणेगाव ते अणदूर असा प्रवास करीत होत्या. नळदुर्गजवळ दुसऱ्या एका दुचाकीने कट मारली होती. त्यात त्या जखमी झाल्या होत्या. त्यांना नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले होते. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आमचं घर उद्ध्वस्त केलं, मग आम्ही तुमच्याच घरात येणार ना!

# छायाचित्रकाराच्या कर्तृत्वाने पंढरीचे नाव देशभर झळकले


## मोदींनी ‘मन की बात’मध्ये केला विशेष गौरव

सुराज्य/पंढरपूर

**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशात कुठेही असले तरी पंढरपूरच्या श्री विठुरायाची नेहमीच आठवण काढत असतात.मोदी हे मन की बात या कार्यक्रमासाठी देशातील विविध क्षेत्रांमधील रत्नांचा शोध घेत असतात एवढेच नव्हे तर या कार्यक्रमात त्या व्यक्तींचा विशेषकरून उल्लेख करत असतात.रविवारच्या मन की बातमध्ये मोदी यांनी पंढरीतील एका छायाचित्रकाराचा गौरव करून पंढरपूरचे नाव उभ्या देशात झळकावले.राहुल गोडसे असे या छात्राचित्रकाराचे नाव आहे.**







नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन येथील अमृत उद्यानात मेळाव्यांच्या प्रदर्शनात पंढरपूरची आषाढी यात्रा, मंगळवेढा तालुक्यातील हुलजंती येथील यात्रा आणि सातारा जिल्ह्यातील म्हसवड यात्रेतील आपले फोटो देणाऱ्या विठ्ठल मंदिराचा छायाचित्रकार राहुल गोडसे यांचे फोटो दाखवत मोदी यांनी गौरव केल्यानंतर साऱ्या सोलापूर जिल्हावासियांचा उर भरून आला होता. देशातील सर्व सण, उत्सव, यात्रा, जत्रा हा या प्रदर्शनाचा विषय होता. यासाठी देशभरातून जवळपास ११ हजार छायाचित्रकारांनी आपले फोटो पाठवले होते.त्यातून मोदी यांनी गोडसे यांच्या छायाचित्रांची मन की बातसाठी निवड केली.

यामध्ये पुरस्कार प्राप्त ६० छायाचित्रे आणि ज्युरी सदस्यांनी टिपलेली २२ सर्वोत्तम छायाचित्रे या प्रदर्शनात मांडण्यात आली आहेत. यामध्ये पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराचे छायाचित्रकार राहुल गोडसे यांच्या तीन फोटोंची निवड करण्यात आली होती. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत सांस्कृतिक मंत्रालयाने मेळा मोमेंट्स छायाचित्र स्पर्धा आयोजित केली होती, तर ललित कला अकादमीने संपूर्ण देशभरासाठी नोडल संस्था म्हणून या स्पर्धेचे कामकाज पाहिले.

सांस्कृतिक राज्यमंत्री डॉ. मीनाक्षी लेखी यांच्या हस्ते ऑक्टोबर २०२२ मध्ये या स्पर्धे चे उद्घाटन झाले होते. ही स्पर्धा १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ मार्च २०२३ या सहा महिन्यांच्या कालावधीत घेण्यात आली होती.

अकादमीने लोकांना त्यांच्या जवळच्या पारंपारिक मेळ्यांना आणि उत्सवांना भेट देण्यासाठी आणि काळाच्या ओघात मागे पडलेल्या आठवणींना उजाळा देण्याच्या उद्देशाने दिलेल्या संकल्पनेनुसार सर्वोत्तम छायाचित्रे क्लिक करण्यासाठी प्रोत्साहित केले होते. या फोटोंचे प्रदर्शन देशवासियांसाठी राष्ट्रपती भवन येथे आयोजित केले होते.गोडसे हे २०१३ पासून फोटोग्राफी करत आहेत.उत्तम छायाचित्रकार म्हणून पंढरीत त्यांचा लौकिक आहे.महाराष्ट्र शासनाकडून दोन कला पुरस्कारही त्यांना मिळाले आहेत.